# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**लाचखोरीप्रकरणी कारवाई होऊन देखील १७४ लाचखोरांचे निलंबन करण्यात आले नसल्याबाबत**

**(१) ४९४५२ (२५-०१-२०२३). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१३ पासून आतापर्यंत लाचखोरीप्रकरणी कारवाई होऊन देखील १७४ लाचखोरांचे निलंबन करण्यात आले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाचखोरीच्या कारवाईत अडकलेल्यांवर निलंबनाची कारवाई करण्यास शासन टाळाटाळ करीत असल्याची माहीती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या आकडेवारीतून स्पष्ट होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई परिक्षेत्रातील सर्वाधिक ३१ तर नागपूर परिक्षेत्रातील ५५ लाचखोरांचा समावेश असुन यामध्ये प्रथमश्रेणी अधिकारी १४, व्दितीयश्रेणी २१, तृतीयश्रेणी ८५, चतुर्थश्रेणी ५ व इतर लोकसेवक ४९ असे एकुण १७४ लाचखोर अजुनही कामावर हजर आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती लाचखोर अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यास विलंब करणाऱ्या शासनाच्या सर्व विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०२३) :** (१), (२), (३) व (४)

i. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अभिलेखानुसार दिनांक ३१.१०.२०२२ रोजी निलंबित न केलेल्या आलोसे यांची एकूण संख्या २१२ होती.

ii. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या संकेतस्थळावर नमूद माहिती दर १५ दिवसांनी अद्यावत करण्यात येते. त्यानुसार दिनांक ०१.१२.२०२२ रोजी पर्यत ती २१२ इतकी आहे.

iii. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अभिलेखानुसार दिनांक ०१.१२.२०२२ रोजी २०२ निलंबित न केलेल्या लोकसेवकांच्या यादीतील मुंबई परिक्षेत्रातील २९ व नागपूर परिक्षेत्रातील ६० आरोपी लोकसेवक यांचा समावेश आहे.

iv. तसेच यामध्ये "गट-अ" चे २३ अधिकारी, "गट-ब" चे ३० अधिकारी, "गट-क" चे ८१ अधिकारी/कर्मचारी व इतर ६८ लोकसेवक असे एकूण २०२ आरोपी लोकसेवक यांना अद्याप निलंबित केलेले नाही.

v. तसेच शासन स्तरावर प्रत्येक प्रशासकीय विभागांच्या सचिवांच्या अध्यक्षतेखालील निलंबन आढावा समितीच्या बैठकीत तसेच मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील आयोजित आढावा बैठकीमध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईत दोषी आढळलेल्या लोकसेवकांना सेवेतून निलंबित करण्याबाबतचा आढावा घेऊन योग्य त्या सूचना दिल्या जातात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**किकवी पेयजल प्रकल्प ब्राम्हणवाडे (ता.त्र्यंबकेश्वर जि.नाशिक) या प्रकल्पाच्या कामाला सुधारित प्रशासकीय मान्यता देणेबाबत**

**(२) ४९४९१ (१८-०१-२०२३). श्री.छगन भुजबळ (येवला), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्राम्हणवाडे (ता.त्र्यंबकेश्वर,जि,नाशिक) येथील गोदावरी खोऱ्याच्या जल आराखडयातील खंड क्र.२ पृष्ठ क्र २७९ अ.क्र १५१ अन्वये किकवी पेयजल प्रकल्पाचा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पास केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाकडून दिनांक २९ सप्टेंबर, २०१४ अन्वये मान्यता मिळालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पेयजल प्रकल्पाच्या कामाला सुधारीत प्रशासकीय मान्यता देऊन या प्रकल्पाचे काम सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १८ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०२३) :** (१) होय. जल आराखड्यातील खंड क्र. २ पृष्ठ क्र. २७९ अ.क्र. १५१ वर किकवी पेयजल प्रकल्पाचा समावेश आहे.

(२) हे अशंत: खरे आहे. पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन , मंत्रालय, मुंबई यांच्या दिनांक २९/०९/२०१४ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रकल्पास तत्वत: मान्यता देण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही. तथापि, यापुर्वी किकवी पेयजल प्रकल्प, ब्राम्हणवाडे ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक या प्रकल्पाचे काम सुरु करणेबाबत तत्कालीन मा. मंत्री, अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य दिनांक २५ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या पत्रान्वये मागणी करण्यात आली आहे.

(४) या प्रकल्पाचा सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्याकडून दिनांक ११/०१/२०२२ अन्वये राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांच्याकडे तपासणीसाठी पाठविण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खेड (जि.पुणे) येथील कलमाडी उपसा जलसिंचन धरणाचे काम प्रलंबित असल्याबाबत .**

**(३) ४९५४८ (१८-०१-२०२३).श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) कलमोडी मध्यम प्रकल्पांतर्गत खेड (जि.पुणे) तालुक्यातील येथील उपसा जलसिंचन धरण योजनेला प्रशासकी मान्यता मिळूनही १६२५ हे सिंचन क्षेत्र सुप्रमा मान्यते अभावी कार्यान्वीत करणे शक्य झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कलमोडी प्रकल्पाचा प्रथम सुधारित प्रस्ताव तयार करुन SLTAC यांना सादर करण्यात आला असून शेरे पुर्तता अहवाल कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगती पथावर आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कालमाडीउपसा जल सचिंन धरण योजनेला सुप्रभा मिळण्याच्यादृष्टिने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०२३) :** (१) हे अशंत: खरे आहे, कलमोडी मध्यम प्रकल्पांतर्गत धरणाचे काम सन २००९ मध्ये पूर्ण झाले असून सुप्रमा अभावी सातगांव पठार उपसा सिंचन योजना हाती घेता आली नाही. योजनेवरील एकूण ५०६५ हे. सिंचन क्षेत्र अद्याप निर्माण व्हायचे आहे.

(२) हे अशंत खरे आहे, राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती क्र.२, पुणे यांनी कलमोडी प्रकल्पाचे प्रथम सुप्रमा अहवालाची अंतिम छाननी केली असून, कलमोडी मध्यम प्रकल्प, ता. खेड जिल्हा पुणे या प्रकल्पाचा रुपये १९८.४९ कोटी किंमतीस प्रथम सुधारित मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून त्यावर कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) सदर प्रस्तावास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही शासनस्तरावर प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोरिवली (मुंबई) येथील राजेंद्र नगर,दत्त पाडा येथे मोठया प्रमाणावर जुगार अड्डे सुरु असल्याबाबत**

**(४) ४९५५३ (). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरिवली (मुंबई) येथील राजेंद्र नगर,दत्त पाडा (बँक ऑफ महाराष्ट्र जवळ) येथे मोठया प्रमाणावर जुगार अड्डे असून स्थानिक पोलिस यंत्रणा त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिनांक १९ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील जुगाराचे अड्डे बंद करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) राजेंद्रनगर, दत्तपाडा बोरीवली पूर्व मुंबई या ठिकाणाजवळ मे. दत्तपाडा स्पोर्ट अ‍ॅन्ड वेलफेअर केंद्र हा सोशल क्लब आहे. सदर सोशल क्लब हा परवाना धारक असून त्याठिकाणी जेष्ठ नागरीकांसाठी मनोरंजन म्हणून कॅरम, चेस व रमी सारखे खेळ खेळले जातात. परंतू या क्लबमध्ये अवैधरित्या जुगार चालू असल्याचे आढळून आल्याने माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये संबंधितांविरुद्ध दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर दोन्ही गुन्ह्यात एकूण ८५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. एका गुन्ह्यात दोषारोपपत्र मा. न्यायालयात सादर करण्यात आले असून दुसऱ्या गुन्ह्यात तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोरपणा तहसिल (जि.चंद्रपूर) येथील आदिवासी निवासी व अनिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी प्रलंबित असलेले शुल्क मिळण्याबाबत.**

**(५) ४९५८४ (१८-०१-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरपणा तहसिल (जि.चंद्रपूर) येथील मागास आदिवासी दुर्गम ग्रामीण भागातील सर्च फाऊंडेशन या संस्थेकडून आदिवासी खेडयापाडयांतील निवासी व अनिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी ६ एकर परिसरात आधुनिक शैक्षणिक संकुल सुरु केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त संस्थेत ६०० विद्यार्थी शिक्षण घेत असून या संस्थेला सन २०१४-१५ पासून शासनाच्या आदिवासी विभागाने नामांकित निवासी शाळेची परवानगी दिलेली आहे असे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरोना काळात सत्र २०२०-२१ चे शैक्षणिक शुल्क २५ टक्के तसेच सन २०२१-२२ चे ३० टक्के शुल्क उशिरा मिळाले असून सध्या संस्था प्रचंड आर्थिक संकटांचा सामना करीत आहे असेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिनांक १५ जून, २०२२ रोजी वा त्यादरम्यान सन २०२२-२३ ची सुरुवात झाली असून यावर्षीचे ५०

टक्के शुल्क व पूर्वीचे प्रलंबित असलेले शुल्क संस्थेला मिळण्याबाबत संस्थेने शासनाकडे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये मागणी केलेली असून उक्त संस्थेचे सुरु असलेल्या वर्षाचे व प्रलंबित असलेले शुल्क संस्थेला देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यांत येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२२-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) राज्यात कोविड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे राज्यातील शैक्षणिक संस्था हया पूर्णत: बंद होत्या. त्यामुळे विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षण देण्यात आले आहे. कोविड-१९ या विषाणूमूळे वित्त विभागाने आर्थिक निर्बंध लागू केल्यामुळे सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात शासन निर्णय दिनांक २९.०३.२०२२ अन्वये २५ टक्के निधी नामांकित शाळांना वितरीत करण्यात आलेला आहे.

तसचे सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात एकूण देय शुल्कापैकी ३० टक्के निधी नामांकित शाळांना वितरीत करण्यात आलेला आहे.

सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात स्कॉलर्स सर्च ॲकेडमी, कोरपना, जि. चंद्रपूर या नामांकित शाळेमध्ये प्रवेशित असलेल्या २६३ विद्यार्थ्यांपोटी रुपये ३२,८७,५००/- व सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात २४४ विद्यार्थ्यांपोटी रुपये ४३,९२,०००/- इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे.

(४) सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात स्कॉलर्स सर्च ॲकेडमी, कोरपना, जि. चंद्रपूर या नामांकित शाळेमध्ये प्रवेशित असलेल्या २२४ विद्यार्थ्यांपोटी रुपये ६७,२०,०००/- इतकी रक्कम ५० टक्केच्या मर्यादेत अदा करण्यात आलेली आहे. उर्वरीत ५० टक्केची रक्कम अदा करण्याबाबतची कार्यवाही अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर यांच्यामार्फत सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खडकवास (जि.पुणे) अंतर्गत असलेल्या पानशेत, वरसगाव पाणलोट क्षेत्रानजीक बांधकामे करुन अतिक्रमण केल्याबाबत

**(६) ४९६६९ (१८-०१-२०२३). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकवास (जि.पुणे) अंतर्गत असलेल्या पानशेत, वरसगाव पाणलोट क्षेत्रानजीक फार्म हाऊस उभारले असून तसेच धरण क्षेत्रातील अतिक्रमण आणि मानवी वास्तव्यामुळे जलप्रदूषणात वाढ झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तिन्ही धरणाच्या पाणलोट क्षेत्रात अतिक्रमण करून बेकायदेशीर बांधकामे झाली असून हॉटेल, अलिशान बंगले, विविध कंपन्यांची बांधकामे वर्षानुवर्षे परिसरात असल्याने धरणाच्या परिसराचा विकास करण्यासाठी आराखडा तयार करण्याचे काम संथ गतीने सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खडकवासला पुणे शहर आणि जिल्ह्याला पाणीपुरवठा करण्याच्या पानशेत, वरसगाव, तसेच खडकवासला धरणांच्या पाण्यात मैलापाण्यासह विषारी रासायनिक पदार्थ सोडले जात असल्याने पिण्याचे पाणी दूषित होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

फार्म हाऊस तीनही धरणांच्या पाणलोट क्षेत्रातील खाजगी मालकीच्या हद्दीत उभारलेली असून जलसंपदा विभागाच्या हद्दीत फार्महाऊस बांधलेले दिसून येत नाही.

(२) हे खरे नाही.
(३) व (४) हे अंशत: खरे आहे,

खडकवासला धरणाच्या परिसरात काही ग्रामपंचायती अस्तित्वात असून त्यातून निर्माण होणारे घरगुती सांडपाणी विना प्रक्रिया/अर्ध प्रक्रियाकृत खडकवासला पाणलोट क्षेत्रात मिसळते. त्याअनुषंगाने कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तसेच ग्रामपंचायतींना नोटीसा देवून उपाययोजना करुन सांडपाणी पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतात मिसळणार नाही याची दक्षता घेण्यास महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, पुणे यांचेमार्फत बजावण्यात आले आहे. तसेच जलसंपदा विभागाकडून संबंधित ग्रामपंचायतीला रितसर नोटीसा देण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**राज्यातील कुटुंब नायायाल्याच्या संख्येत वाढ करून नव्याने जादा कुटुंब न्यायालये स्थापन करण्याबाबत**

**(७) ४९७१७ (१५-०३-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील हल्लीच्या कुटुंब न्यायालयांवरील कामकाजाचा वाढता ताण लक्षात घेता काही ज्यादा कुटुंब न्यायालये स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशाप्रकारे स्थापन करण्यात यावयाच्या न्यायालयांची एकूण संख्या किती आणि ही प्रस्तावित न्यायालये कोणत्या ठिकाणी स्थापन करण्यात येणार आहेत, तसेच अशाप्रकारे ज्यादा कुटुंब न्यायालये स्थापन करण्याच्या कार्यवाहीची दिनांक १० नोव्हेंबर २०२२ अखेर सध्यस्थिती काय आहे,
(३) असल्यास, ही जास्तीची न्यायालये स्थापन करण्याची कार्यवाही पूर्ण होण्यास सुमारे किती कालावधी लागणे अपेक्षित आहे?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) राज्यात ३० ठिकाणी कौटुंबिक न्यायालये स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. ती खालीलप्रमाणे

| अ.क्र. | ठिकाण | संख्या | |
|---|---|---|---|
| | मुंबई | १७ | मा. उच्च न्यायालयाकडून प्राप्त प्रस्तावानुसार कौटुंबिक न्यायालये स्थापन करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. |
| | नागपूर | ५ | |
| | पुणे | ४ | |
| | अमतरावती | १ | |
| | नाशिक | १ | |
| | सोलापूर | १ | |
| | बेलापूर (नवी मुंबई) | १ | दि.२२.११.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वे बेलापूर येथे कौटुंबिक न्यायालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. |
| | एकूण | ३० | |

(३) नियमानुसार

---

**राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीदिनी मद्यविक्री केल्याबाबत**

**(८) ४९७३९ (१८-०१-२०२३). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नितेश राणे (कणकवली), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीदिनी मद्यविक्रिस मनाई असतानाही मुंबईतील अंधेरी येथील पंचतारांकित

हॉटेल सहारा स्टारमध्ये सर्रास मद्यविक्रि सुरु असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोशल मिडियावर जाहीरात करुन मद्य घेणाऱ्या ग्राहकांना दिनांक ३ ऑक्टोबर, २०२२ या तारखेचे देयक देऊन त्यावर चुकीचा जीएसटी क्रमांक टाकण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या प्राथमिक चौकशीत सदर हॉटेलातील सहारा बॅरल या बारमध्ये चार नियमांचे उल्लंघन झाले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सहारा स्टार या पंचतारांकित हॉटेलवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शंभूराज देसाई (२४-०२-२०२३) :**(१) हे खरे आहे. तथापि, सहारा स्टार ही पंचतारांकित हॉटेल आस्थापना असून, महाराष्ट्र विदेशी मद्य (रोखीने विक्री, विक्रीच्या नोंदवह्या, इ.) नियम, १९६९ मधील नियम १० (१) मधील दुसऱ्या परंतुकानुसार तीन तारांकित दर्जा व त्यावरील तारांकित दर्जा असलेल्या हॉटेल आस्थापनेस निवडणुकीचे दिवस व मतमोजणीचे दिवस वगळता इतर कोरडे दिवस (Dry day) लागू नाहीत.
(२) (३) व (४) प्रस्तुत प्रकरणी वृत्तमान पत्रातील बातमीच्या अनुषंगाने सदर अनुज्ञप्तीचे दि. ०३.१०.२०२२ रोजी निरीक्षण करुन त्यावेळी सदर अनुज्ञप्तीमध्ये आढळून आलेल्या विसंगतीबाबत नियमभंगाचे प्रकरण नोंदविले आले. अनुज्ञप्तीमध्ये आढळून आलेल्या सदर विसंगतीच्या अनूषंगाने, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या दिनांक २४.०१.२०२३ रोजीच्या आदेशान्वये अनुज्ञप्तीधारकाकडून ५०,००० हजार रुपये इतका दंड आकारून सदर प्रकरण निकाली काढण्यात आले आहे.
तसेच, महाराष्ट्र राज्यात मद्य विक्रीवर मुल्यवर्धित कर (VAT) आकारण्यात येत असून, वस्तू व सेवा कर (GST) आकारण्यात येत नाही. दैनिक वृत्तपत्रामध्ये छापलेल्या देयकामध्ये मद्य विक्रीवर मुल्यवर्धित कर (VAT) गोळा केल्याचे दिसून येत असून, त्या देयकावर मुल्यवर्धित कर नोंदणी दाखला क्रमांक आढळून येत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पिंप्री सद्दोद्दीन (ता.इगतपुरी जि.नाशिक) येथील आदिवासी विकास विभागाच्या क्रीडा प्रबोधिनीचे काम सुरु करण्याबाबत

**(९) ४९७६९ (१८-०१-२०२३). श्री.छगन भुजबळ (येवला), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंप्री सद्दोद्दीन (ता.इगतपुरी जि.नाशिक) येथील गट न.२८१,२८२,२८५,२८९ एकूण क्षेत्र २१.०८ हे.आर पैकी १८.७३ या क्षेत्रावर आदिवासी विकास विभागाची क्रीडा प्रबोधिनीचे काम करण्यासाठी सुधारित अंदाजपत्रकासह शासनास प्रस्ताव पाठविण्याबाबत दिनांक २४ एप्रिल २०२२ रोजी वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे झालेल्या बैठकीत शासनाने निर्णय घेवूनही माहे नोव्हेंबर, २०२२ च्या पहिल्या सप्ताहापर्यंत शासनाकडे सदर प्रस्ताव प्राप्त झालेला नाही असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने कामाला प्रशासकीय मान्यता देण्यासाठी शासनानाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०३-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
अनुसूचित जमातीच्या विद्यार्थी तसेच विद्यार्थीनी करीता इगतपूरी, जि. नाशिक येथे क्रीडा प्रबोधिनीच्या बांधकामाकरीता शासन निर्णय दिनांक २९.०५.२०१४ अन्वये रुपये ५९९९.९३ लक्ष इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदरचे काम अर्थसंकल्पात समाविष्ट न झाल्यामुळे तसेच बराच कालावधी लोटल्यामुळे नव्याने प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(२) व (३) याबाबत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक व अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक कार्यालयाने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, नाशिक यांना दिनांक २८.०४.२०२२ अन्वये सदर बांधकाम करण्यासाठी पुढील ३ वर्षाचे नियोजन करावे व सुधारीत अंदाजपत्रके व आराखडे तयार करण्याबाबत कळविले होते. त्यानुसार सहायक अभियंता श्रेणी-१, सावर्जनिक बांधकाम (आदिवासी) उपविभाग, नाशिक यांचेमार्फत क्रिडा प्रबोधिनीच्या बांधकामासाठी आवश्यक नकाशे व आराखडे खाजगी वास्तुशास्त्रज्ञ यांचेकडून तयार करण्यात आले आहेत. सदर नकाशे व आराखडे आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक कार्यालयाकडून शासनास प्राप्त झाल्यानंतर तपासून कार्यवाही करण्यात येईल.

---

**राज्य शासनामध्ये ०१ नोव्हेंबर, २००५ पुर्वी कंत्राटी, हंगामी व नंतर सेवेत कायम झालेल्या शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन देण्याबाबत**

**(१०) ४९७७० (२३-०१-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय, निमशासकीय कर्मचारी व शिक्षकांना नवीन अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागू झाली असून, सदर योजना रद्द करून सर्वांना 'जुनी पेन्शन' योजना लागू करावी, अशी मागणी राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांकडून वारंवार करण्यात येत असून उक्त मागणीसाठी राज्य सरकारी कर्मचारी संघटनेने दिनांक २१ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास राज्यव्यापी बाईक रॅली काढून निषेद व्यक्त केला, हे खरे आहे काय,

(२) राज्य शासनाने दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पुर्वी कंत्राटी, हंगामी व नंतर सेवेत कायम झालेल्या शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन देण्यासंदर्भात दिनांक १९ जानेवारी, २०१९ रोजी वित्त राज्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगट स्थापन केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतनाचा लाभ केंद्राच्या नवीन निवृत्ती वेतन योजनेचे अनुकरण करण्याबाबत अभ्यास गटाने शासनास अहवाल सादर केला आहे काय,

(४) असल्यास, अभ्यास गटाच्या अन्य शिफारशी काय आहेत व त्यानुषंगाने निर्णयात्मक कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(५) असल्यास, अद्याप अभ्यास गटाने आपला अहवाल शासनास सादर केला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) वित्त विभाग, शासन निर्णय दि.१९/०१/२०१९ अन्वये मा.राज्यमंत्री (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीच्या अंमलबजावणीतील त्रूटींचा अभ्यास करुन या योजनेमध्ये येणाऱ्या अडचणींचे निराकरण आणि योजनेची परिणामकारकरित्या अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने अभ्यासगटाची स्थापना करण्यात आली आहे.

अभ्यास गटाने आतापर्यंत २ शिफारशी केल्या आहेत.

(१) नवीन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना / राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली मध्ये शासनाचे अंशदान १०% ऐवजी १४% अशी वाढ करणे

(२) या योजनेच्या सदस्यास उपदान व सेवेत असताना मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना कुटुंबनिवृत्तिवेतन अनुज्ञेय करणे.

वरील शिफारशींपैकी क्रमांक (१) येथील शिफारशींच्या अनुषंगाने दिनांक १९.०८.२०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

---

## केंद्र शासनाकडे जीएसटी भरपाईची रक्कम असल्याबाबत

**(११) ४९९६४ (२३-०१-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या जीएसटी भरपाई कायद्याअंतर्गत माहे जून, २०२२ अखेर राज्याची जीएसटी जवळपास २२००० कोटीची भरपाईची रक्कम केंद्राकडे प्रलंबित असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास ,केंद्राकडे प्रलंबित जीएसटी भरपाईची रक्कम राज्यास प्राप्त झाली आहे काय,

(३) असल्यास, केंद्राकडे प्रलंबित जीएसटी भरपाईची रक्कम राज्याला मिळावी यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) केंद्राकडून राज्य शासनास दि. ९ नोव्हेंबर, २०२२ रोजी रु.५७९२ कोटी व दि.२४ नोव्हेंबर, २०२२ रोजी रु.२०८०कोटी इतकी जीएसटी भरपाईची रक्कम प्राप्त झाली आहे.

तसेच भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांनी ऑडिट करुन महसूल प्रमाणित केल्यानुसार सन २०१८-१९ व २०१९-२० करिता अतिप्रदानित झालेली रु.१२८४ कोटी एवढी रक्कम समायोजित (BOOK ADJUSTMENT) करण्यात आलेली आहे.

(३) नुकसान भरपाई राज्यास मिळण्यासाठी केंद्रास वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

जीएसटीच्या अंमलबजावणीमुळे होणारी नुकसान भरपाई भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांच्यमार्फत जीएसटी (Compensation to state) ॲक्ट, २०१७ मधील कलम ७ च्या तरतुदीनुसार ऑडिट करुन महसूल प्रमाणीत करेपर्यंत, तदर्थ स्वरुपात दिली जाते.

सन २०१७-२०१८, २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२०२१ या वर्षाचा महसूल भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांनी प्रमाणित केला असून, ३१ मार्च २०२१ पर्यंतची सर्व नुकसान भरपाई राज्यास प्राप्त झालेली आहे.

सन २०२१-२०२२ व १ एप्रिल २०२२ ते ३० जून २०२२ या तिमाहीचे भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांचे ऑडीट अजून बाकी असून उर्वरित रु.१३२१५ कोटी एवढी रक्कम या दोन वर्षाच्या भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांच्या ऑडीट पूर्ण झाल्यानंतर जीएसटी (Compensation to state) ॲक्ट, २०१७ मधील कलम ७ च्या तरतुदीनुसार राज्यास प्राप्त होईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## ठाणे जिल्ह्यात पाणी पुरवठा करण्यासाठी काळू व शाई धरण बांधण्याबाबत

**(१२) ४९९७६ (१८-०१-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील ठाणे, कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी, अंबरनाथ तसेच बदलापूर या शहरांचे वाढत

असलेल्या नागरीकरणामुळे पाण्याची होत असलेली वाढती मागणीसाठी काळू व शाई धरण बांधण्यासाठी भूसंपादन प्रक्रियेसाठी माहे ऑगस्ट,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निधी जाहीर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त धरण बांधण्यासंदर्भात आतापर्यंत केलेल्या कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, पाणीटंचाई दूर करण्यासाठी महत्वाचे असलेले काळू व शाई धरण प्रकल्पांच्या कामांना लवकरात लवकर सुरुवात करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विंलबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२३) :** (१) होय, अशंत: खरे आहे.

काळू धरणासाठी आवश्यक असलेल्या वन जमिनीचे नक्त वर्तमान मुल्य (NPV) अदा करणेस्तव रू. ३९६ कोटी व खाजगी जमिनींच्या संयुक्त मोजणीसाठी रूपये १० लक्ष इतका निधी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडून दिनांक ०३/०१/२०२३ रोजी प्राप्त झाला आहे. शाई धरण बांधण्यासाठी निधी दिलेला नाही.
(२) काळू नदी प्रकल्पासाठी आवश्यक सर्व वैधानिक मंजुऱ्या घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर असून वन विभागाची अंतिम मान्यतेसाठी NPV निधी अदा करुन अटी व शर्तीची पूर्तता करुन अंतिम मान्यता घेणे प्रगतीत आहे. तसेच, सदर प्रकल्पासाठी आवश्यक खाजगी जमीन भुसंपादन व प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन प्रक्रिया सुरू आहे.

शाई नदी प्रकल्पास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी प्रशासकीय मान्यता दिली होती व सदर प्रकल्प जलसंपदा विभागास ठेव तत्वावर बांधकामासाठी देण्यात आला होता. तथापि, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या दि. ०७/११/२०१४ रोजीच्या पत्रान्वये करारनामा संपुष्टात आल्यामुळे सदर प्रकल्पाबाबत पुढील कोणतीही कार्यवाही करणे शक्य झालेले नाही.
(३) काळू नदी प्रकल्प :-

१) बाधित होणारे वनक्षेत्रासाठीची तत्त्वत: मान्यता पुनर्जिवीत करून अंतिम मान्यता प्राप्त करण्याची कार्यवाही सुरू आहे.

२) प्रकल्पामुळे बाधीत होणारे खाजगी क्षेत्र भुसंपादन करण्यासाठीचे प्रस्ताव उप अधीक्षक, भुमी अभिलेख, मुरबाड यांना पाठवण्यात आले आहेत. त्यातील पाच गावांची संयुक्त मोजणी करण्यासाठी रू. १०.३५ लक्ष इतक्या रक्कमेची मागणी प्राप्त झाली असून सद्यस्थितीत सदर निधी MMRDA यांचेकडून प्राप्त झाला आहे.

३) भुसंपादन प्रक्रिया पुढे सुरू करणेस्तव प्रकल्पास सामाजिक परिणाम मुल्यांकन (SIA) करण्यातून सुट मिळण्याच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

शाई नदी प्रकल्प:-

करारनामा संपुष्टात आल्यामुळे कार्यवाही करता येत नांही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## येवला ( जि.नाशिक) येथील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या परिक्षेत्रात अधिसूचित विशिष्ट नागरी सेवा व सुविधा पुरविण्याबाबत

**(१३) ४९९९७ (२३-०१-२०२३). श्री.छगन भुजबळ (येवला), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवला (जि.नाशिक) या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या परिक्षेत्रात अधिसूचित विशिष्ट नागरी सेवा व सुविधा पुरवणे या कामांची स्थगिती रद्द करून या तेरा कामांना निधी उपलब्ध करण्याची लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ सप्टेंबर २०२२, दिनांक २० ऑगस्ट, २०२२ व दिनांक १५ ऑगस्ट, २०२२ रोजी शासनाकडे निवेदनान्वये मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कामांची स्थगिती उठविणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबनाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०२३) :** (१) दि. १५ ऑगस्ट, २०२२, दि. २० ऑगस्ट, २०२२, दि. २६ नोव्हेंबर, २०२२ व दि. २३ डिसेंबर, २०२२ रोजीची निवेदने प्राप्त झालेली आहेत.
(२) येवला (जि. नाशिक) या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या परिक्षेत्रात अधिसूचित विशिष्ट नागरी सेवा व सुविधा पुरवणे या योजनेंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या कामांची निवड थेट शासन स्तरावरुन नियोजन विभागामार्फत करण्यात आली होती व सदर कामांसाठीच्या निधीचा विनियोग सन २०२१-२२ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेल्या तरतूदीमधून करण्यात येणार होता. मात्र शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक-संकिर्ण-२०२१/प्र.क्र.३६/का.१४११, दि. ०७ जुलै, २०२२ नुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या परिक्षेत्रात अधिसूचित विशिष्ट नागरी सेवा व सुविधा पुरवणे या योजनेच्या अंमलबजावणीच्या कार्यपद्धतीमध्ये बदल करण्यात येऊन सदर योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांची निवड आता नगर विकास विभागामार्फत करण्यात येणार असल्याने नियोजन विभागामार्फत निवड करण्यात आलेल्या कामांना देण्यात आलेली स्थगिती उठविण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अलमट्टी धरणाची उंची वाढविल्याने सांगली व कोल्हापूर जिल्हयातील गांवाना पुराचा सामना करावा लागत असल्याबाबत

**(१४) ५०१२५ (१८-०१-२०२३). श्री.हसन मुश्रीफ (कागल), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलमट्टी धरणाची उंची ५२४ मीटरपर्यंत वाढविण्याचा कर्नाटक शासनाने निर्णय घेतल्यामुळे राज्यातील सांगली व कोल्हापूर जिल्हयातील गावांवर विपरित परिणाम होणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोल्हापूर व सांगली शहराला कृष्णा व पंचगंगा नद्यांना येणाऱ्या पुरांमुळे मोठी हानी होत असून याचे कारण अलमट्टी धरणाचे बॅकवॉटर हेच कारणीभूत असल्याचे वेळोवेळी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कर्नाटक शासनाकडे कोणते अभिप्राय व्यक्त केले आहेत , हे खरे आहे काय,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
शासनामार्फत भिमा व कृष्णा खोऱ्यात सन २०१९ मध्ये उद्भवलेल्या पूर परिस्थितीची कारणे शोधणे व भविष्यकालीन उपाययोजना सुचविण्यासाठी नेमलेल्या अभ्यास समितीने सादर केलेल्या अहवालामध्ये अलमट्टी व हिप्परगी धरण हे सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील पूर परिस्थिती निर्माण होण्यासाठी कारणीभूत ठरत नसल्याचे नमुद केले आहे.
(३) पूर नियंत्रणाच्या दृष्टीने कर्नाटक शासनाशी समन्वय साधण्यासाठी महाराष्ट्र व कर्नाटक राज्यांची त्रिस्तरीय समिती स्थापन करण्यात आली असून पूर विषयक माहितीचे अदान-प्रदान करण्यात येऊन पूर नियंत्रणाबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## राज्य कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करण्याबाबत

**(१५) ५०२८६ (२४-०१-२०२३). श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र सरकार मधील अधिकारी कर्मचारी यांचे निवृत्तीचे सन १९९६ पासून वय ५८ वर्षावरुन ६० वर्षे झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यालाच अनुसरून देशातील २५ राज्यामध्ये निवृत्तीचे वय ५८ वरुन ६० वर्षे करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना व राज्य अधिकारी महासंघ राज्यशासकीय कर्मचाऱ्यांचे निवृत्तीचे वय ६० वर्षे करण्याबाबत शासनाकडे सातत्याने मागणी करत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.
सन १९९८ पासून केंद्र शासनातील कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षे वरुन ६० वर्षे केले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) सद्य:स्थितीत सदर बाब शासनाच्या विचाराधीन नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अभियांत्रिकी सेवा परीक्षा २०१९ मधील पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्यास होत असलेला विलंब

**(१६) ५०३४२ (१८-०१-२०२३). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगा अंतर्गत घेण्यात आलेल्या महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा परीक्षा २०१९ द्वारे जलसंपदा विभागात अभियांत्रिकी पदासाठी माहे एप्रिल २०१९ मध्ये जाहिरात देऊन परीक्षा घेण्यात आलेल्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर परीक्षेचा निकाल दिनांक १० जून, २०२२ रोजी जाहीर करण्यात आलेला असून पात्र उमेदवारांना अद्यापही नियुक्ती आदेश देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्याची मागणी निफाड विधानसभा क्षेत्राचे लोकप्रतिनिधी यांनी माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन सबंधित पात्र उमेदवारांना तातडीने नियुक्ती देणे संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०२३) :** (१) होय. खरे आहे.
(२)महाराष्ट्र अभियांत्रिकी (स्थापत्य) सेवा परीक्षा २०१९ मधून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने जलसंपदा विभागातील विविध पदांवर शिफारस केलेल्या उमेदवारांमधील कागदपत्र पडताळणीसाठी उपस्थित राहिलेल्या उमेदवारांपैकी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS)आरक्षण प्रवर्गातून शिफारस झालेल्या ५० उमेदवारांच्या संदर्भात प्रकरण न्याय प्रविष्ठ असल्याने तसेच एका उमेदवाराविरोधात फौजदारी गुन्हा दाखल असून प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्याने अशा एकूण ५१ उमेदवारांना वगळून उर्वरित पात्र ५०६ (५०१ + ५) उमेदवारांचे नियुक्ती आदेश अनुक्रमे दिनांक ०१.१२.२०२२ व दिनांक ४.१.२०२३ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत.
(३) होय. खरे आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ब्रम्हपूरी(जि.चंद्रपूर) तालुक्यातील मेंडकी व अडयाळ उपसा सिंचन योजनेस निधीसह प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत

**(१७) ५०३४९ (१८-०१-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ब्रम्हपूरी (जि.चंद्रपूर) तालुक्यातील मेंडकी व अडयाळ परिसरातील जवळपास २२ गावातील शेतीला सिंचनाची सोय

उपलब्ध नसल्यामुळे गोसीखुर्द प्रकल्पाचे पाणी उपलब्ध होण्यासाठी गोसीखुर्द प्रकल्पाचे भाग असलेल्या मेंडकी व अडयाळ उपसा सिंचन योजना विदर्भ पाटबधारे विकास महामंडळ नागपूर यांनी प्रस्ताव तयार करून अंतिम मान्यतेसाठी शासनाकडे सादर केलेला प्रस्ताव मान्यते अभावी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी तालुक्यातील गोसीखुर्द प्रकल्पाचे भाग असलेल्या मेंडकी व अडयाळ उपसा सिंचन योजनेस निधीसह प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत लोकप्रतिनिधींनी मा.उपमुख्यमंत्री यांना दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ व दिनांक १० ऑक्टोबर, २०२२ रोजी लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन या दोन्ही उपसा सिंचन योजनेस प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०२-२०२३) :** (१) अंशत खरे आहे.
प्रस्तावित अड्याळ व मेंडकी उपसा सिंचन योजनेचे प्रस्ताव हे शासनाच्या तत्वतः मान्यतेकरीता महामंडळा तर्फे शासनास सादर करण्यात आलेला असून प्रस्तावित अड्याळ उपसा सिंचन योजनेस शासनाचे पत्र क्र. अड्याळ/उसियो-२०२१/प्र. क्र. २६४/मोप्र-२ दि.२७.१२.२०२२ अन्वये शासनाची तत्वतः मान्यता प्राप्त झालेली आहे. मेंडकी उपसा सिंचन योजनेस तत्वतः मान्यता देण्याबाबतची कार्यवाही प्रगतीत आहे.
(२) अंशत: खरे आहे.
प्रश्नात नमूद दिनांकाची लोकप्रतिनिधींची निवेदने प्राप्त नाहीत. तथापि याविषयाच्या अनुषंगाने लोकप्रतिनिधींची इतर दिनांकाची निवेदने प्राप्त आहेत.
(३) अड्याळ उपसा सिंचन योजनेस क्र.अड्याळ/उसियो-२०२१/प्र.क्र. २६४ /मोप्र-२, दिनांक २७.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रस्तावाचे अंदाजपत्रक अद्ययावत करुन प्रकल्पाच्या सुप्रमा मध्ये अंतर्भूत करुन मान्यतेनंतर काम हाती घेण्याच्या अटीस अधीन राहून तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आली आहे.
मेंडकी उपसा सिंचन योजनेचा प्रस्ताव तत्वत: मान्यतेसाठी सादरीकरणात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तुळजापूर तालुक्यातील (जि.उस्मानाबाद ) काक्रंबा व परिसरात महावितरणकडून शेतीसाठी दिवसाआड कमी दाबाने वीज पुरवठा होत असल्याबाबत

**(१८) ५०३६१ (२६-१२-२०२२). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तुळजापूर तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) काक्रंबा व परिसरात महावितरणकडून शेतीसाठी एक दिवसाआड कमी दाबाने वीज पुरवठा होत असल्याने विजेअभावी शेतपिंकाना पाणी देणे अशक्य होत असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे ऑगस्ट ते ऑक्टोबर, २०२२ या महिन्यामध्ये उन्हाची तीव्रता वाढलेली असल्याने पिकांना घातलेले पाणी जमिनीत मोठ्या प्रमाणात जिरते त्यामुळे जमिन कोरडी पडून शेतपिकांचे नुकसान होत असतानाही एक दिवसाआड पाणी मिळत असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण पसरले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले,त्यानुसार शेतीसाठी वीज पुरवठा सुरळीत करण्याच्या दृष्टिने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
माहे ऑक्टोबर-२०२२ मध्ये तुळजापूर तालुक्यातील (जि. उस्मानाबाद) काक्रंबा व परिसरात महावितरण कंपनीतर्फे योग्य दाबाने वीज पुरवठा करण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.
सदर परिसरात नोव्हेंबर-डिसेंबर-२०२१ च्या दरम्यान खूप पाऊस झाल्यामुळे माहे डिसेंबर २०२१ ते मार्च २०२२ च्या दरम्यान ११ के.व्ही. काक्रंबा वाहिनीवर क्षमतेपेक्षा जास्त भार वाढल्याने सदर परिसरात तांत्रिक अपरिहार्यतेमुळे चक्राकार पध्दतीने एक दिवसाआड वीज पुरवठा करण्यात आला होता. तथापि, माहे ऑगस्ट-२०२२ ते ऑक्टोबर-२०२२ दरम्यान काक्रंबा व परिसरातील शेतीपंप वीज ग्राहकांना योग्य दाबाने वीज पुरवठा करण्यात आलेला आहे.
(३) ११ के.व्ही. काक्रंबा शेती वाहिनीवरील वाढीव लोड विचारात घेऊन कार्ला/ खंडाळा येथे RDSS योजनेअंतर्गत ३३/११ के.व्ही. ५ एम.व्ही.ए. क्षमतेचे नवीन उपकेंद्र प्रस्तावित केले आहे. तसेच ११ के.व्ही. काक्रंबा वाहिनीवरील प्रतीक्रियाशिल (Reactive) विद्युत भार कमी करण्यासाठी या वाहिनीवर कॅपॅसिटर बॅंक बसविण्याचे प्रस्तावित केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हा वार्षिक योजना अतंर्गत सन २०२१-२०२२ मध्ये मंजुर झालेल्या विकासकामांना दिलेल्या स्थगितीबाबत

**(१९) ५०३८८ (२३-०१-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत सन २०२१-२२ या आर्थीक वर्षामध्ये चंद्रपूर जिल्हयातील ग्रामपंचायती करिता जनसुविधा निधी अंतर्गत चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या दिंनाक ३० मार्च २०२२ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी जनसुविधा निधी अंतर्गत प्राप्त प्रस्तावातील कामे नियमानुसार मंजूर केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या सर्व विकास कामांना शासनाने दिंनाक १४ जुलै २०२२ रोजीच्या परिपत्रकानुसार स्थगिती दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या सर्व विकास कांमाना दिलेली स्थगिती उठवून विकासकामे सुरू करण्यासाठी लोकप्रतिनिधी दिनांक १० ऑक्टोंबर २०२२ रोजी मा. उपमुख्यमंत्री यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करुन सर्व कामांना दिलेली स्थगिती उठवून कामे पुर्ववत सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०२३) :** (१) हे खरे आहे
(२) दिनांक १४/०७/२०२२ च्या पत्रान्वये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२१-२२ च्या चंद्रपूर जिल्ह्यातील जनसुविधा निधी
अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या परंतु निविदा प्रक्रिया व कार्यारंभ आदेश न दिलेल्या कामांना पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती देऊन
नवीन पालकमंत्री महोदयांच्या नियुक्त्या झाल्यानंतर जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२१-२२ अंतर्गत मान्यता दिलेल्या प्रस्तुत कामांची यादी
पालकमंत्री महोदयांच्या पुनर्विलोकनार्थ सादर करुन ती कामे पुढे चालू ठेवावीत किंवा कसे याबाबत नवनियुक्त पालकमंत्री महोदयांच्या सहमतीने किंवा
जिल्हा नियोजन समितीच्या पुढील बैठकीत निर्णय घेण्याबाबत कळविण्यात आले होते
(३) हे खरे आहे
(४) विद्यमान पालकमंत्री, चंद्रपूर यांनी स्थगिती दिलेल्या कामांचे पुनर्विलोकन करुन ग्रामपंचायत भवन, स्मशानभूमी विकास कामे व इतर विकास कामे अशी सुमारे २९८ कामे सुरु करण्याबाबतचे निर्देश दिले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**त्र्यंबकेश्वर तालुक्यातील (जि.नाशिक) देवीचा पाडा-शेंद्रीपाडा येथील तास नदीवर पूल बांधण्याबाबत**

**(२०) ५०४३३ (१८-०१-२०२३). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवीचा पाडा-शेंद्रीपाडा (ता.त्र्यंबकेश्वर,जि.नाशिक) येथील तास नदीवर पूल नसल्याने विद्यार्थ्यांना नदी ओलांढून शाळेत जावे लागत असून ग्रामस्थांना ४ कि.मी लांबीचा फेरा (वळसा) घेऊन दऱ्याखोऱ्यातून जीवघेणा प्रवास करावा लागत असल्याचे दिनांक १० जुलै, २०२२ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त भागात जास्त प्रमाणात पाऊस पडत असूनही पाणी साठवण्याची कोणतीच उपाययोजना नसल्याने ग्रामस्थांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नदीवर पूल बांधण्याबाबत ग्रामस्थांनी तहसिलदार त्र्यंबकेश्वर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, त्र्यंबकेश्वर यांना माहे मे, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान मागणी करुनही अद्याप कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर नदीवर पूल बांधण्याबाबत व पाणी साठविण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत (०६-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) देवीचा पाडा ते शेंद्रीपाडा यादरम्यान येणाऱ्या तास नदीवर अस्तित्वात असलेला पुल माहे जुलै, २०२२ मध्ये आलेल्या पावसामुळे वाहुन गेल्याने त्याठिकाणी स्थानिक आमदार निधीतून लोखंडी पुल बांधण्यात आलेला आहे.

जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत तास नदीकाठच्या शेंद्रेपाडा व देवीचापाडासाठी नळ पाणीपुरवठा योजनेची कामे प्रगतीत आहेत. सद्यस्थितीत सदर पाड्यांना बैठी जलकुंभाद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. योजनेतील उर्वरित कामे माहे, मार्च, २०२३ पर्यंत पूर्ण करुन गावांना व पाड्यांना पाणीपुरवठा सुरु करण्याचे नियोजित आहे.

देवीचा पाडा ते शेंद्रीपाडा हा रस्ता अवर्गीकृत असून अशा प्रकारच्या अद्याप बारमाही रस्त्याने न जोडलेल्या राज्यातील आदिवासी वाड्या/पाडे यांना मुख्य रस्त्याशी जोडण्यासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील चिल्हेवाडी मध्यम पाटबंधारे प्रकल्पासाठी निधी मिळण्याबाबत**

**(२१) ५०५२१ (१८-०१-२०२३). श्री.अतुल बेनके (जुन्नर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील चिल्हेवाडी मध्यम पाटबंधारे प्रकल्पाच्या द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव मंजूरीसाठी शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता देवून प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सन २०२२-२३ या वर्षात ३० कोटी रुपये अधिकचे देऊन सन २०२३-२४ या वर्षासाठी उर्वरित ५७.४० कोटी रुपये इतका निधी मिळण्याबाबत लोकप्रतिनिधीनी मा.उपमुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक ०२ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन पाटबंधारे प्रकल्पाच्या द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता देवून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यातयेत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२३) :** (१) नाही, पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील चिल्हेवाडी मध्यम पाटबंधारे प्रकल्पाच्या रु. ३१३.४८ कोटी किंमतीच्या प्रस्तावास शासन निर्णय, जलसंपदा विभाग, दिनांक १४/०२/२०२३ अन्वये द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(२) होय.
(३) चिल्हेवाडी मध्यम प्रकल्पासाठी सन २०२२-२३ च्या वार्षिक आखणीमध्ये रु. ३० कोटीची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. सन २०२३-२४ साठी प्रकल्पांना अर्थसंकल्पीय तरतूद करण्यासंदर्भात वार्षिक आखणीची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदपूर (जि.अहमदनगर) तालुका येथे उर्ध्व मानार उपसा सिंचन योजनेअंतर्गत सौर ऊर्जा प्रकल्प राबविण्याबाबत

**(२२) ५०६०४ (१८-०१-२०२३). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदपूर (जि.अहमदनगर) तालुक्यातील अवर्षण प्रवण क्षेत्रातील शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ देण्यासाठी ऊर्ध्व मानार उपसा सिंचन योजना ही मध्यम प्रकल्पाच्या जलाशयावर बांधण्यात आली असून या योजनेतून लाभक्षेत्र ३०००.०० हेक्टर असून पाणीवापर १४.१३ द.ल.घ.मी. एवढा आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेतून रब्बी व उन्हाळी हंगामामध्ये प्रत्येकी चार वेळा सिंचनास पाणी सोडण्यात येत असते, सरासरी वार्षिक विदयुत भाडे अंदाजे ५० लक्ष एवढे येत असून ते शेतकऱ्यांकडून वसूल करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ही योजना सौर ऊर्जेवर चालविण्यात आल्यास, त्याचा विदयुत खर्च कमी होऊन शेतकऱ्यांना त्यांचा लाभ होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन ऊर्ध्व मानार उपसा सिंचन योजना सौर ऊर्जेवर चालविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२३) :** (१) हे अशंत: खरे आहे, सदर योजना तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर मधील आहे.
(२) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण आदेश क्र. १/२०१८ दि.११-०१-२०१८ नुसार सन २०१८-१९ पासून प्राप्त विद्युत देयकाच्या १९% इतकी रक्कम शेतक-यांकडून वसुल करण्यात येते.
(३) होय, हे खरे असून, विनाखंडीत विद्युत पुरवठा होईल व विद्युत खर्च कमी होऊन शेतक-यांना व शासनालाही त्याचा लाभ होणार आहे.
(४) उर्ध्व मानार उपसा सिंचन योजना ता. अहमदपूर जिल्हा लातूर येथे सौर उर्जा प्रकल्प बसविणेबाबत शासनास प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मुख्य अभियंता(विद्यूत), यांचे तांत्रिक व्यवहार्यतेबाबत अभिप्राय घेऊन आर्थिक व तांत्रिक व्यवहार्यतेसह सविस्तर प्रस्ताव सादर करण्याबाबत कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांना कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

---

## म्हाडाच्या सदनिका विकासकाच्या ताब्यात असल्याबाबत

**(२३) ५०६४८ (२६-१२-२०२२). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हाडाच्या सुमारे साडे तीन हजार सदनिका मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे अद्यापही विकासकांच्या ताब्यात असून विकासकाकडून भाडयापोटी ४५० कोटी इतकी रक्कम येणे बाकी असल्याचे दिनांक ३ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले , हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन रक्कमेच्या वसूलीत कसूर करण्याऱ्या अधिकाऱ्यांविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-१२-२०२२) :** (१) ४२ खाजगी विकासकांना ४२१२ संक्रमण गाळे वितरीत करण्यात आले होते. त्यापैकी १४२९ संक्रमण गाळे मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळास परत करण्यात आले असून सद्य:स्थितीत २७८३ एवढे गाळे विकासकाच्या ताब्यात आहेत. माहे एप्रिल २०१६ ते माहे ऑक्टोबर २०२२ या कालावधीत रू.१९१.२४ कोटी इतक्या रकमेची वसूली विकासकांकडून करण्यात आलेली असून माहे ऑक्टोबर २०२२ अखेरपर्यंत रू.१४०.८२ कोटी इतकी रक्कम विकासकांकडे थकीत आहे.
(२) विकासकाकडील संक्रमण शिबीरातील गाळयांच्या भाडेवसूली करण्याच्या जबाबदारीमध्ये कसूर करणाऱ्या ५ भाडेवसूलीकारांविरूद्ध विभागीय चौकशीची कारवाई करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील आदिवासी जनता मूलभूत हक्कांपासून वंचित असल्याबाबत

**(२४) ५०७४३ (१८-०१-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील वाडा तालुका मधील (१) पाचघर जोडरस्ता ता.वाडा, (२) दाभोण रस्ता (३) नवापाडा जोडरस्ता (४) कोलीमसरोवर जोडरस्ता (५) न्याहाळी जोडरस्ता (६) मालोंडे जोडरस्ता (७) सासण जोडरस्ता (८) खोडरे जोडरस्ता (९) आरवाडा जोडरस्ता (१०) मुहमाळ-ताडमाळ जोडरस्ता (११) गारगांव – सुतकपाडा जोडरस्ता (१२) आवितपाडा जोडरस्ता ही १००% आदिवासी वस्तीमधील रस्त्यांची कामे स्वातंत्र्यापासून आजतागायत प्रलंबित असल्याने येथील आदिवासींना मुख्य प्रवाहात येण्यासाठी खूप अडचणींना सामोरे जावे लागते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या गावांना आदिवासी प्रकल्प अधिकारी व कार्यकारी अभियंता सा बां.विभाग जव्हार यानी प्रत्यक्ष भेट देवून पाहणी करुन तसा प्रस्ताव शासनाकडे मंजूरीकरीता सादर केला आहे काय, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन तातडीने वरील ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करुन रस्ते मंजूरीबाबत येत्या आगामी अर्थसंकल्पामध्ये सामाविष्ट करुन येथील आदिवासींची गैरसोय दूर करण्याकरीता या कामांना प्रशासकिय मान्यता देणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२८-०२-२०२३) :** (१), व (२) अंशत: खरे आहे.
(३) आदिवासी वाडे/पाडे, आश्रमशाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र यांना बारमाही रस्त्याने जोडण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील आदिवासी विकास महामंडळाकडून सन २०१७-२०१८ मध्ये गोऱ्हे केंद्राकडून खरेदी केलेले भाताचे लिलाव केला नसल्याबाबत

**(२५) ५०७४४ (२६-१२-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यात आदिवासी विकास महामंडळाकडून सन २०१७-२०१८ मध्ये गोऱ्हे केंद्राकडून खरेदी केलेले भाताचे आजमितीस लिलाव न केल्याने घुशी व उंदीरांमुळे वाया गेल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्य वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तदनुसार चौकशीत काय निष्पन्न झाले, तसेच दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत

**डॉ. विजयकुमार गावीत (२७-१२-२०२२) :** (१) व (२) गोऱ्हे केंद्राकडून खरेदी करण्यात आलेल्या धानापैकी ई-लिलावाद्वारे विक्री केलेल्या वजन १२६४ क्विंटल धानामध्ये वजन ६३.८० क्विंटल घट आलेली आहे. वजन ६३.८० क्विंटल पैकी १% वाजवी घट वजन १२.६४ क्विंटल असुन उर्वरीत अवाजवी घट वजन ५१.१६ क्विंटल आहे. सदर अवाजवी घट वजन ५१.१६ क्विंटल वसुल करण्यासाठी संबंधीत कर्मचारी यांना वसुली आदेश आदिवासी विकास महामंडळाकडुन निर्गमित करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सारुळ (ता. केज, जि. बीड) येथील नवीन १३२/३३ के.व्ही. उपकेंद्राला निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(२६) ५०९७८ (२०-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सारुळ, (ता. केज, जि. बीड) येथील १३२/३३ के.व्ही. उपकेंद्राचा प्रस्ताव पत्र क्र. ED (Dist.)/CE (Dist.)/EHV/Sarul/१६८१९/ दिनांक २४ जून, २०२२ अन्वये महावितरण कंपनी कडून महापारेषण कंपनीस सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदर उपकेंद्राची तांत्रिक सुसाध्यता मुख्य अभियंता, औरंगाबाद, महापारेषण. यांच्या कडून सांघिक कार्यालयास प्राप्त झाली असून सारुळ बाबत प्रणाली अभ्यास करण्यात आला असून सदर उपकेंद्राचा राज्य पारेषण उपक्रमाच्या २०२२-२३ ते २०२६-२७ या पंचवार्षिक आराखडयात समाविष्ट करण्यासंदर्भात निर्णय घेण्यात येईल असे उपसचिव, ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई. यांना मुख्यअभियंता (रा.पा.उ), मुंबई. यांनी कळवले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर उपकेंद्राचा राज्य पारेषण उपक्रमाच्या २०२२-२३ ते २०२६-२७ या पंचवार्षिक आराखडयात समाविष्ट करून सदर उपकेंद्रासाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रधान सचिव, उर्जा विभाग, मुंबई.यांच्याकडे दि. १३/०७/२०२२ रोजी वा त्यासुमारस निवेदनाद्वारे केली होती, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून उपकेंद्राचा समावेश पंचवार्षिक आराखडयात करण्याबाबत तसेच निधी उपलब्ध करून देण्यात साठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
तथापि, प्रस्तावित उपकेंद्र २२०/३३ के.व्ही. चे असून १३२/३३ के.व्ही. चे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) सारुळ, ता. केज, जि. बीड येथे २२०/३३ के.व्ही. उपकेंद्र उभारण्यास महापारेषण कंपनीच्या संचालक मंडळाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. उपकेंद्र उभारणीसाठीची जमिन महापारेषण कंपनीच्या ताब्यात आहे. उपकेंद्राचा प्रस्ताव मा. वीज नियामक आयोगाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आला आहे. मा. वीज नियामक आयोगाची मान्यता प्राप्त झाल्यावर उपकेंद्राची निविदा प्रक्रिया महापारेषण मार्फत हाती घेण्यात येण्याचे प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**लातूर जिल्ह्यातील कातपुर रोडवरील एका उद्योजकाच्या बंगल्यावर दरोडा टाकल्याबाबत**

**(२७) ५१०४७ (२४-०१-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्ह्यातील कातपुर रोडवरील एका उद्योजकाच्या बंगल्यावर दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ रोजी ८ ते १० जनाच्या टोळीने सशस्त्र दरोडा टाकुन तीन कोटीचा मुद्देमाल पळविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक पोलीस स्टेशन मध्ये दरोड्याचा गुन्हा नोंद झाला आहे काय, तपासा अंती किती आरोपींना अटक करण्यात आली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०२-२०२३) :** (१) होय

(२) सदर प्रकरणी विवेकानंद चौक, पोलीस स्टेशन लातूर येथे गु.र.नं.५८९/२०२२ भा.दं.वि. कलम ३९५, ३९७, १२० (ब), व भारतीय हत्यार कायदा १९५९ चे कलम ३, ४/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी एकुण ४ आरोपींना अटक करण्यात आली असून इतर आरोपींचा शोध सुरु आहे. अटक आरोपींकडून एकुण रुपये ९५,०३,९०३/- किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदर प्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयातील ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या पर्यटनाची बनावट वेबसाईट बनवून पर्यटकांची फसवणूक केल्याबाबत**

**(२८) ५१०७३ (२६-१२-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयात काही महिन्यांपूर्वी ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या पर्यटनाची बनावट वेबसाईट बनवून पर्यटकांची फसवणूक केल्याचे माहे ऑगस्ट,२०२२ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी आढळून येणाऱ्या आरोपीवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०१-२०२३) :** (१) व (२) पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांच्या कार्यक्षेत्रात दि.०४.०७.२०२२ रोजी एका व्यक्तिची ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प चंद्रपूर वन विभागाचे सफारी बुकींग करताना अधिकृत संकेतस्थळ असल्याचे भासवून फसवणूक केल्याबाबतची तक्रार प्राप्त झाली आहे. याबाबत अज्ञात आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन, दुर्गापूर येथे गु. र. क्र.१२२/२०२२ भादंवि कलम ४१९ सह कलम ६६ (सी), ६६ (डी) माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयातील संकेतस्थळे डोमेन करणाऱ्या कंपन्यांविरुध्द फेक संकेतस्थळे बंद करण्यासाठी सीआरपीसी च्या कलम ९१ अन्वये नोटीस बजावली असून आरोपीचा शोध घेण्यात येत असून पुढील तपास सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तारूगव्हान उच्च पातळी बंधारा( ता. पाथरी, जि. परभणी) या कामास झालेल्या विलंबाबाबत**

**(२९) ५१२४४ (१८-०१-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारूगव्हान उच्च पातळी बंधारा (ता. पाथरी जि. परभणी) या कामास झालेल्या विलंबाची चौकशी करून कंत्राटदारास काळया यादीत टाकणेबाबत व रद्द केलेल्या दंडाची रक्कम वसूल करणेबाबत लोकप्रतिनिधी ने दिनांक ०२ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) होय.

कंत्राटदाराची कामाची गती समाधानकारक नसल्यामुळे बंधाऱ्यात पाणीसाठा व सिंचन निर्मीतीचे उददीष्ट साध्य होत नसल्याने दि. ३०/०६/२०१९ पर्यंत भाववाढ गोठवुन कंत्राटदारास प्रतीदिन रु. १०,०००/- इतका दंड आकारण्यात आला होता. कंत्राटदारास सदर कामापोटीची भाववाढ दि. ३०/०६/२०१९ पर्यंत गोठविण्यात आलेली असून सद्यस्थितीत बंधाऱ्यामध्ये पाणीसाठा व सिंचन निर्मिती झालेली आहे.
(३) सदर चौकशीच्या अनुषंगाने उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे कंत्राटदारास सदर कामापोटीची देय भाववाढ दि. ३०/०६/२०१९ पर्यंत गोठविण्यात आलेली आहे. बंधाऱ्यामध्ये जुलै-२०२० मध्ये पाणीसाठा व सिंचन निर्मिती झालेली असल्याने आता विलंबाचा अथवा कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औंढा नागनाथ शहर पाणी पुरवढा योजना (जि.हिंगोली) ''महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेंतर्गत'' सिध्देश्वर जलाशयातून पाणी हक्कास मंजूरी मिळणेबाबत**

**(३०) ५१२६३ (१८-०१-२०२३). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यात महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगात्थान योजनेअंतर्गत औंढा नागनाथ शहर पाणी पुरवठा योजनेसाठी सिध्देश्वर जलाश्यातून हक्काचे पाणी मिळण्याबाबतचा प्रस्ताव कार्यकारी संचलाक गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचेकडून व्यवस्थापकीय सचालक तथा अप्पर मुख्य सचिव, (ज.स.प्र.व.वि.) जलसंपदा विभाग यांच्याकडे दिनांक ०७ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यानुसार सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावास तात्काळ मंजूरी देण्यात यावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनीही मा.उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री महोदयांकडे दिनांक १५ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, तद्अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०२-२०२३) :** (१) होय
(२) होय
(३) महामंडळ निर्णय क्र.सिंचन शाखा-१/औंढा नागनाथ शहर पाणी पुरवठा योजना, ता.औंढा (नागनाथ), जि.हिंगोली /१५९७/१३/२०२२, दि. ३०/११/२०२२ अन्वये औंढा नागनाथ शहर पाणी पुरवठा योजना, जि.हिंगोली या योजनेस पुर्णा प्रकल्प (सिध्देश्वर जलाशयातून) १.६४२ द.ल.घ.मी. पिण्यासाठी पाणी हक्क मंजूर करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हा नियोजन समितीतर्फे सन २०२०-२०२१ या वर्षात कोविडच्या उपाय योजनेकरिता करण्यात आलेल्या खर्चामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(३१) ५१२९६ (२३-०१-२०२३). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हा नियोजन समितीतर्फे सन २०२०-२०२१ या वर्षात कोविडच्या उपाय योजनेकरिता जिल्हा आरोग्य अधिकारी, अमरावती यांच्यामार्फत करण्यात आलेल्या खर्चामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता व गैरप्रकार झाला असल्याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे दिनांक १० जानेवारी, २०२२ रोजी वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानुसार संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०२३) :** (१) हे खरे आहे
(२) केंद्र शासनाचे (Principal Accountant General (Audit-१)) दिनांक ०५/०४/२०२ ते जून २०२२ या कालावधीमध्ये लेखा परीक्षण झालेले असून अभिलेखे व नस्ती च्या लेखापरीक्षणादरम्यान खर्चामध्ये गैरव्यवहार झाल्याचे आक्षेप घेतलेले नाहीत.
(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**मौजे सुकळी (ता. धारूर, जि. बीड) या गावाच्या पुनर्वसनाच्या सुधारीत खर्चाच्या प्रस्तावास मान्यता मिळण्याबाबत**

**(३२) ५१४११ (१८-०१-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे सुकळी (ता. धारूर जि. बीड) या गावाच्या पुनर्वसनाच्या सुधारीत खर्चाच्या प्रस्तावास मान्यता मिळणे संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाने दिनांक २६ सप्टेंबर, २०२२ रोजी च्या पत्रान्वये कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारा विभाग, औरंगाबाद यांना शेरे पुर्तता अहवाल मागवण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेरे पुर्तता अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०२-२०२३) :** (१) हो, हे खरे आहे,
(२) महामंडळ कार्यालयाचे पत्र जा.क्र.गोमपाविम/ तां-४/धा-११/मौ.सुकळी पुनर्वसन/७८१, दि.२५/०१/ २०२३ अन्वये शेरे पुर्तता अहवाल शासनास सादर करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगाव (ता.अर्धापूर जि. नांदेड) येथील सार्वजनिक आरोग्य विभागाने गट क्र. २३७,२३८ व २४४ पैकी विनावापर जागा ग्रामीण रुग्णालयासाठी हस्तांतरीत करण्याबाबत**

**(३३) ५१४६९ (१८-०१-२०२३). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगाव (ता.अर्धापूर, जि. नांदेड) येथे सार्वजनिक आरोग्य विभागाने रु. १४.३२ कोटी इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता दिलेल्या ग्रामीण रुग्णालयासाठी जागा उपलब्ध होत नसल्याने जलसंपदा विभागाच्या मालकीच्या गट क्र. २३७,२३८ व २४४ पैकी विनावापर असणारी ३ एकर जागा ग्रामीण रुग्णालयासाठी हस्तांतरीत करण्याबाबत जलसंपदा विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या बैठकीतील निर्णयानुसार जलसंपदा विभागाने सदर जागेचे मूल्य भरणा करण्यास सार्वजनिक आरोग्य विभागास कळविले आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, ग्रामीण रुग्णालय हे सार्वजनिक प्रयोजन असल्याने स्थानिक जनतेची होणारी गैरसोय लक्षात घेऊन सार्वजनिक आरोग्य विभागाने जागेचे मूल्य भरण्यास असमर्थता दर्शविली असली तरीही विशेष बाब म्हणून सदरची जमीन सार्वजनिक प्रयोजनार्थ सार्वजनिक आरोग्य विभागास विनामूल्य हस्तांतरीत करण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी जमीन हस्तांतरीत करण्यासंदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
महामंडळाच्या अधिनियमानुसार हस्तांतरीत करावयाच्या मालमत्तेचे मुल्याकंन महामंडळास भरणा करण्यासंदर्भात जिल्हा शल्यचिकित्सक, नांदेड यांनी दि.०६.०८.२०२१ च्या पत्रान्वये मुल्यांकन प्रस्तावास शासन मान्यतेनंतर निधी वर्ग करण्यात येईल असे कळविले आहे.
(३) होय हे खरे आहे.
(४) महामंडळातील जमिनी प्रकल्पासाठी आवश्यकतेनुसार संपादीत करण्यात आलेल्या असतात. त्याकरिता त्याचे मुल्य अदा करण्याकरिता खर्च करण्यात आलेला असतो. त्यामुळे अन्य प्रयोजनाकरिता जमिनी हस्तांतरीत करताना प्रचलित बाजार भावानुसार मुल्य प्राप्त झाल्यानंतर हस्तांतरीत करण्यात येतात. महामंडळाकडील जमिनी विनामुल्य हस्तांतरण करण्याचे कोणतेही धोरण सद्य:स्थितीत अस्तित्वात नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## "नो लिकर झोन" म्हणून ओळखल्या जाणा-या खारघर परिसरातील हॉटेल निरसुक पॅलेसला देण्यात आलेला दारूचा परवाना रद्द करण्याबाबत

**(३४) ५१४७३ (२९-०१-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खारघर (ता.पनवेल, जि.रायगड) येथील "नो लिकर झोन" म्हणून ओळखल्या जाणा-या परिसरात हॉटेल निरसुक पॅलेसला दारू विक्रीचा परवाना दिल्यामुळे नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षक हब म्हणून ओळखल्या जाणा-या खारघर परिसरात देशाच्या कानाकोप-यातून विद्यार्थी शिक्षणासाठी येत असून वास्तव्य करीत असताना नव्याने दारू विक्रीचा परवाना दिल्यामुळे नो लिकर झोन म्हणून ओळखल्या जाणा-या खारघर परिसरातील वातावरण दुषित झाले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून नो लिकर झोन म्हणून ओळखल्या जाणा-या खारघर परिसरातील उक्त हॉटेलचा परवाना रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई (२४-०२-२०२३) :**(१) (२) व (३) हॉटेल निरसुख पॅलेस, सेक्टर १०, कोपरा, ता. पनवेल या आस्थापनेस जिल्हाधिकारी, रायगड यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा अबकारी समितीच्या दिनांक ०१.०९.२०२२ रोजीच्या बैठकीतील शिफारशीनुसार परवानाकक्ष (FL-३) अनुज्ञप्ती मंजूर करण्यात आली आहे. खारघर अथवा कोपरा हे परिसर नो-लिकर झोन म्हणून घोषित करण्यात आलेले नाही. खारघर परिसरात यापुर्वीपासून अन्य दोन एफएल-३ अनुज्ञप्त्या कार्यरत आहेत. त्यापैकी एक अनुज्ञप्ती २००४ तर दुसरी अनुज्ञप्ती २०१५ पासून कार्यरत आहे.

खारघर प्रभागातील मद्य विक्री अनुज्ञप्त्या बंद करावयाच्या असल्यास मुबंई दारुबंदी (ग्रामसभा ठराव पारित केल्यामुळे अथवा नगरपरिषद/महानगरपालिकेच्या वॉर्डातील मतदारांनी निवेदन दिल्यामुळे अनुज्ञप्ती बंद करणे) आदेश, २००८ नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उर्ध्व पेनगंगा (जि.नांदेड) प्रकल्पांतर्गत इसापूर उजवा कालवा व त्यावरील बांधकामांचे सर्वेक्षणाचे काम तातडीने पुर्ण करुन दुरुस्ती करण्याबाबत

**(३५) ५१४७५ (१८-०१-२०२३). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयातील उर्ध्व पेनगंगा प्रकल्पांतर्गत इसापूर उजवा कालवा व त्यावरील बांधकामे क्षतिग्रस्त असल्याने कालव्याची वहन क्षमता कमी होऊन जवळपास ५०% वर आलेली असल्याने नियोजित सिंचन क्षमतेवर विपरीत परिणाम होत असून शेतकरी सिंचनाच्या सुविधेपासून वंचित रहात आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विशेष मोहिम राबवून सदर कालव्याच्या क्षतिग्रस्त बांधकाची तपासणी करुन मुळ संकल्पीत काटच्छेदा नुसार दुरुस्ती अथवा पुर्नबांधणी करण्याची विनंती जलसंपदा विभागाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ३२३ कि.मी. कालवा व २०२ क्षतीग्रस्त बांधकामे तातडीने दुरुस्त करण्याच्या दृष्टीने सतत बैठका व चर्चा नंतरही सर्वेक्षणाचे काम अद्याप पुर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, हे सर्वेक्षणाचे काम तातडीने पुर्ण करुन विशेष दुरुस्ती करण्यासंदर्भात शासनाकडून पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०२-२०२३) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
इसापूर उजव्या कालव्याची संकल्पित वहन क्षमता ६५.८५ क्युमेक्स आहे. परंतु सदर कालवा क्षतिग्रस्त असल्याने ३४.०० क्युमेक्स इतकाच विसर्ग आवर्तन काळात सोडण्यात येत आहे.
(२) होय, हे खरे आहे.
मा.श्री.अशोक चव्हाण, विधानसभा सदस्य यांनी त्यांचे पत्र दिनांक ३० जुलै, २०२२ अन्वये सदर दुरुस्तीचे कामाबाबत मागणी केली आहे.
(३) सर्वेक्षणाच्या कामाचे उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्र.६, नांदेड या विभागामार्फत कार्यारंभ आदेश देण्यात आले असून ९ कालव्याच्या सर्वेक्षणापैकी ७ कालव्याच्या सर्वेक्षणाची कामे पुर्ण झाली असून, दोन कालव्याच्या सर्वेक्षणाची कामे क्षेत्रीयस्तरावर प्रगतीपथावर आहेत.
(४) सर्वेक्षण पुर्ण झालेल्या कामाची अंदाजपत्रके तयार करण्याचे काम क्षेत्रीयस्तरावर प्रगत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात लघु पाटबंधारे प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देताना दि. १३/०७/२०१८ च्या शासन निर्णयातील निकष/मापदंड सन २०२१-२२ च्या दरसूचिनुसार सुधारीत करण्यासंदर्भात

**(३६) ५१४९१ (१८-०१-२०२३). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात लघु पाटबंधारे प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देताना विचारात घ्यावयाचे जलसंपदा विभागाचे सद्याचे निकष/मापदंड दि. १३/०७/२०१८ च्या शासन निर्णयाने निश्चित करण्यात आले असून सदरचे निकष/मापदंड सन २०१६-१७ च्या दरसूचिवर आधारीत आहेत , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यस्थितीत सन २०२१-२२ च्या दरसूचिवर आधारीत प्रकल्पाचे अंदाजपत्रक तयार केल्यास कोणताही लघू पाटबंधारे प्रकल्प दि. १३/०७/२०१८ च्या मापदंडात बसत नसल्यामुळे प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्यास विभागाला अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी दि. १३/०७/२०१८ च्या शासन निर्णयातील निकष/मापदंड सन २०२१-२२ च्या दरसूचिनुसार सुधारीत करण्याची विनंती लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने दि. १३/०७/२०१८ च्या शासन निर्णयातील निकष/मापदंड सन २०२१-२२ च्या दरसूचिनुसार सुधारीत करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, आली आहे वा करण्यात येत आहे ?

(५) नसल्यास, विलंबाची  कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०२-२०२३) :** (१) होय.

(२) होय खरे आहे, काही ल.पा. प्रकल्पांचे प्रस्ताव पाणी साठयाच्या प्रतिसघमी मापदंडात बसत नसल्याने EPC/मंत्रीमंडळासमोर मान्यतेस्तव सादर करावे लागतात.

(३) होय.खरे आहे

(४) लघु पाटबंधारे प्रकल्पांचे प्रचलित मापदंडामध्ये सुधारणा करणेसाठी शासन स्तरीय सचिव समितीची बैठक संपन्न झाली असून मापदंड सुधारित करण्याची नस्तीवर बैठकीत झालेल्या निर्णयाप्रमाणे वित्त व नियोजन विभागाची सहमती घेवून मापदंड सुधारित करण्याची कार्यवाही विभागा मार्फत प्रगतीत आहे.

(५) विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## ढाणकी, फुलसावंगी फाटा ( जि.यवतमाळ) येथे उच्चदाब वाहिनीची केबल नागरिकांच्या घरालगत जोडल्यामुळे नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण झाल्याबाबत

**(३७) ५१५७१ (१७-०१-२०२३). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ढाणकी, फुलसावंगी फाटा ( जि.यवतमाळ) येथे उच्चदाब वाहिनीची केबल नागरिकांच्या घरालगत जोडल्यामुळे नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने वीज वितरण कंपनीचे उपकार्यकारी अभियंता यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०२२ रोजीच्या सुमारास तक्रार करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने उच्चदाब वाहिनीची केबल इतर ठिकाणी जोडण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
माहे ऑगस्ट, २०२२ रोजीच्या सुमारास वीज वितरण कंपनीचे उपकार्यकारी अभियंता यांच्याकडे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(२) ढाणकी, फुलसावंगी फाटा (यवतमाळ) येथे राष्ट्रीय महामार्ग रस्ता विस्तारीकरण/चौपदरीकरण करण्याचे काम राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण नांदेड यांनी मे. रुद्रनी इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, औरंगाबाद यांचेमार्फत पूर्ण केले आहे. त्याअंतर्गत उच्चदाब उपरीतार मार्ग व भूमिगत वाहिनी उर्जायन करणेकरिता विद्युत निरीक्षक, यवतमाळ यांचेकडून ऊर्जायन परवानगी प्राप्त झाल्यानंतर सदर वाहिनी भारीत करण्यात आलेली आहे. सदर काम हे सुरक्षिततेच्या दृष्टकोनातूनच पूर्ण करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील धरणांच्या पाणलोट क्षेत्राच्या २०० मीटर परिसरात बांधकामांना बंदी घालण्यात आल्याबाबत**

**(३८) ५१७४७ (१८-०१-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व धरणांच्या पाणलोट क्षेत्राच्या दोन्ही बाजूस जलप्रदूषण रोखण्यासाठी २०० मीटरच्या परिसरात कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम करण्यास राज्य शासनाकडून बंदी घालण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मात्र या परिसरातील जुनी बांधाकामे प्रस्तावित शासकीय बांधकामे याबाबत काय कारवाई करावी, याबाबत अधिकाऱ्यांमध्ये संभ्रम आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन हा संभ्रम दूर करण्याबाबत तसेच या आदेशाची परिणामकारक अंमलबजावणी करण्याबाबत काय कार्वाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२३) :** (१) होय. हे अंशत: खरे आहे.
दिनांक २९.०७.२०२२ रोजीच्या परिपत्रकान्वये मोठया व मध्यम प्रकल्पाच्या धरणाच्या जलाशयाच्या वरच्या भागातील नागरी वसाहत सोडून इतर विकास कामांबाबत धरणाच्या वरच्या बाजूस पूर फुगवटा (HFL) पासून २०० मी. Horizontal अंतर हे प्रतिबंधित क्षेत्र राहील असा निकष निश्चित करण्यात आला होता.
आता शासन जलसंपदा विभागाने दिनांक १३.१२.२०२२ रोजीच्या परिपत्रकान्वये, दिनांक २९.०७.२०२२ रोजीचे परिपत्रक रद्द करून दिनांक ०८.०३.२०१८ रोजीचे परिपत्रक पुनर्प्रस्थापित केले आहे.
दिनांक ०८.०३.२०१८ रोजीच्या परिपत्रकामधील धरणाच्या जलाशयाच्या वरच्या भागातील नागरी वसाहत सोडून इतर विकास कामांबाबत व्दारयुक्त जलाशयासाठी धरणाच्या वरच्या बाजूस HFL + १ मी. Vertical किंवा ७५ मी. Horizontal यातील जे कमीत कमी अंतर असा निकष आहे.
(२) हे खरे नाही.
धरणाच्या व पायथ्यालगतच्या क्षेत्रामध्ये कोणत्याही प्रकारच्या विकासाची कामे करण्यासाठी पूर पातळीपासून अंतराच्या निकषाबाबत शासन परिपत्रक, जलसंपदा विभाग, क्रमांक- संकीर्ण २०१२ / (प्र. क्र. २० /२०१२)/सिं. व्य (महसुल), दिनांक ०८.०३.२०१८ नुसार निषिध्द क्षेत्रातील बांधकामाबाबत स्वयंस्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत व सदर परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कारडा कन्स्ट्रक्शन नाशिक यांनी बनावट दस्तावेज तयार करुन प्लॉट खरेदी करुन केलेली फसवणुक**

**(३९) ५१८१८ (१७-०१-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील नामांकित विकासक कारडा कन्स्ट्रक्शन यांनी बँकेकडे कर्जापोटी गहाण ठेवलेल्या प्लॉटच्या कागदपत्रांमध्ये बँकेचे अधिकारी व कर्मचारी यांच्याशी संगनमताने बनावट दस्तावेज करुन फसवणुक केल्याचे माहे जुलै, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आला हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार संबधित दोषी आढळून आलेल्यांवर कारवाई केलेली वा करण्यात येते आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०२-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी गंगापूर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.१५७/२०२२, भारतीय दंड संहिता कलम ४०६, ४०९, ४६८, ४४७, ४६९, ४७१, १२० अन्वये दिनांक ०२.८.२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी आरोपीला अटक करण्यात आली असून अधिकचा तपास सुरु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**औरंगाबाद येथून खंडणीखोरांनी नाशिक येथील व्यावसायिकाकडून खंडणी वसुल केल्याबाबत**

**(४०) ५१८२० (१७-०१-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील शेअर बाजारातील व्यावसायिकाकडून नाशिक सातपूर पोलीस ठाण्याच्या परिसरातील काही खंडणीखोर गुंडांनी जीवे मारण्याची धमकी देत दहा लाखांची ऑडी कार व ३० हजार रुपयांचे दोन मोबाइल फोन नेल्याची बाब माहे जुलै, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आली हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, या गुंडांनी धमकी देत औरंगाबाद येथे या व्यावसायिकांकडून २० लाख रुपयांची खंडणी वसूल केली हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक शहरात मोठ्या प्रमाणात गुन्हेगारी वाढली असून पोलीस यंत्रणेचा यावर अंकुश राहिला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी आढळुन आलेल्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०२-२०२३) :**(१) व (२) आरोपींनी नाशिक मधील शेअर बाजार व्यावसायीकास सातपूर येथे भेटण्यासाठी बोलावले व चाकूचा धाक दाखवून संबंधित व्यावसायीकास त्याच्या औरंगाबाद येथील मित्रामार्फत एका अनोळखी इसमास रुपये २० लाख देण्यास भाग पाडले.

तसेच आरोपींनी सदर व्यवसायीकाकडून जबरदस्तीने त्यांची ऑडीकार व मोबाईल फोन घेऊन पळून गेले.

(३) हे खरे नाही.

(४) संबंधित व्यवसायीकाने दिनांक ३०.०६.२०२२ रोजी सातपूर पोलीस स्टेशन येथे दिलेल्या तक्रारी नुसार गु.र.नं. १६३/२०२२ भा.द.वि कलम ३६४ (अ), ३८४, ३८६, ३४, प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यातील दोन आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांचेकडून चोरी करुन नेलेली ऑडी कार, मोबाईल फोन व रू.३.४० लाख रक्कम हस्तगत करण्यात आली असून प्रकरण तपासाधीन आहे.

(५) विलंब झालेला नाही.

---

### अंबाजोगाई (ता.केज, जि.बीड) तालुक्यातील नवीन साठवण तलावांना मंजुरी देण्याबाबत

**(४१) ५२०८९ (२७-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (ता.केज, जि.बीड) येथे पिण्यासाठी तसेच शेतीलाही पाणी उपलब्ध नसल्याने १८ ठिकाणी साठवण तलाव व्हावे यासाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणात मागणी केली आहे. हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भागातील ग्रामस्थानी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने ग्रामस्थाना मुबलक प्रमाणात पाणी मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सदर ठिकाणी साठवण तलावांना पाणी उपलब्ध करून देऊन साठवण तलावांना मंजुरी देणे बाबतची मागणी दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ व दि. २९ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास राज्याचे जलसंपदा मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने साठवण तलावांना मंजुरी देण्याबाबत तसेच निधी उपलब्ध करून देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.सदर १८ साठवण तलाव (अंबाजोगाई तालुक्यात ११ व केज तालुक्यात ०७) व्हावे यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केलेली आहे.

(२) होय,हे खरे आहे. विषयांकित प्रकरणी श्रीमती नमिता अक्षय मुंदडा (केज) मा.विधानसभा सदस्य यांचे दि.२९.१०.२०२२ रोजीचे निवेदन प्राप्त आहे.

(३) सदरील निवेदनामध्ये अंबाजोगाई तालुक्यातील ११ व केज तालुक्यातील ०७ असे एकूण १८ नवीन तलावास पाणी उपलब्धता करुन देण्याची मागणी केलेली आहे.

शासन पत्र दि.१४.१०.२०२१ अन्वये मध्य गोदावरी उपखो-यात १९.२९ अ.घ.फु. अतिरिक्त अनुज्ञेय पाणी वापरास मान्यता दिली आहे.सदर पाणी वापराचे नियोजन शासन पत्रातील अटींचे अधीन राहुन करणेबाबत निर्देश आहेत.त्यानुसार अंबाजोगाई तालुक्यातील एकूण ०५ प्रकल्प शासन पत्रातील अट-''ड''नुसार नियोजनात प्रस्तावित आहेत.

प्राथमिक सर्वेक्षणानुसार निवेदनात मागणी केलेले उर्वरित अंबाजोगाई तालुक्यातील ०६ साठवण तलाव व केज तालुक्यातील ०७ साठवण तलाव असे एकूण १३ तलावांसाठी शासन पत्रातील अटीची पुर्तता होत नसल्याचे निदर्शनास येते असल्याने त्यानुषंगाने क्षेत्रीय स्तरावर आवश्यक तपासणी सुरु आहे.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

### यवतमाळ जिल्हयातील आश्रमशाळेत सोयीसुविधांच्या अभावामुळे विदयार्थांची गैरसोयी होत असल्याबाबत

**(४२) ५२०९९ (१८-०१-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील आश्रमशाळांमध्ये आवश्यक सोयी-सुविधा नसल्याने आदिवासी विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याची बाब माहे सप्टेंबर-२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय

(२) असल्यास, मुख्याध्यापक अधीक्षक आश्रमशाळेत राहत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आश्रमशाळेला कायमस्वरुपी निवासी अधीक्षक राहण्यासंदर्भात तसेच विध्यार्थींच्या सोयी-सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत (२७-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) शासकीय आश्रमशाळा व अनुदानित आश्रमशाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, वसतीगृह अधीक्षक/अधीक्षिका यांना मुख्यालयी राहणेबाबत दिनांक २४ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार मुख्यालयी राहत नसल्याचे आढळून आल्यास प्रकल्प अधिकारी यांचेमार्फत सबंधितांवर कारवाई करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्हयातील आदिवासी आश्रमशाळांमधील विदयार्थ्यांना मिळणारे जेवण निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

**(४३) ५२२३७ (१८-०१-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेळघाटासह अमरावती जिल्हयातील आदिवासी आश्रम शांळामधून प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे विदयार्थ्यांना सकाळी नाश्ता दिला जात नाही तसेच दिले जाणारे जेवणही निकृष्ट दर्जाचे असून त्यातही जेवणाच्या वेळा पाळल्या जात नसल्याचे माहे सप्टेबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आश्रमशाळेमधील विदयार्थ्यांच्या नियमीत आरोग्य तपासण्याही होत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन या आश्रमशाळांवर कारवाई करण्यासह येथील विदयार्थ्यांना योग्य सोयीसुविधा तातडीने पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत (२२-०२-२०२३) :**(१) व (२) हे खरे नाही.
(३) आश्रमशाळेतील विद्यार्थ्याची दरमहा फिरते आरोग्य पथक/आर.बी.एस.के. मार्फत (आरोग्य विभागामार्फत) तपासणी केली जाते. विद्यार्थ्यांना सोयी सुविधा पुरविण्याच्या अनुषंगाने आश्रमशाळेतील वसतीगृहांच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांना दर्जेदार, पोषणयुक्त जेवण मिळण्याच्या दृष्टीने दोन मध्यवर्ती स्वयंपाकगृहास मान्यता देण्यात आली असून त्यांच्या बांधकामास सुरुवात झालेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दर्यापूर( जि अमरावती ) तालुक्यात येवदा येथे आदिवासींना खावटी अनुदान योजनेत धान्य व पूरक पदार्थाचे निकृष्ट किट वितरीत झाल्याबाबत

**(४४) ५२२६७ (१८-०१-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास विभागच्या खावटी अनुदान योजनेअंतर्गत आदीवासी बांधवांना आवश्यक कडधान्य व इतर जीवनाश्यक वस्तूंचे किटचे वितरण करण्यात येते हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दर्यापूर ता.येवदा येथील श्रीमती रेश्मा सुनीत मालवे यांना देण्यात आलेल्या किटमधील १६ जीवनाश्यक वस्तु अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याचे माहे सप्टेंबर २०२२ च्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय
(३) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०६-०२-२०२३) :** (१) व (२) कोरोना काळात आदीवासी बांधवांची उपासमार होऊ नये म्हणून १ वर्षासाठीच (२०२०-२१) खावटी अनुदान योजना राबविण्यात आली होती.

आदिवासी विकास महामंडळाने खावटी किट पुरविणा-या पुरवठादारासोबत केलेल्या करारनाम्यामध्ये प्रत्यक्षात वाटप करताना काही किट सदोष आढळल्यास त्या परत करून बदलून देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

श्रीमती रेशमा सुनील मालवे यांनी त्यांना प्राप्त झालेले खावटी किट निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार आदिवासी विकास महामंडळाकडे केलेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**टेंब्रुसोंडा (ता.चिखलदरा जि. अमरावती) शासकीय आश्रमशाळेतील मुख्याध्यापिकेने केलेला अपहार**

**(४५) ५२२६९ (१८-०१-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे टेंब्रुसोंडा (ता.चिखलदरा, जि.अमरावती) येथील शासकीय आश्रमशाळेच्या मुख्याध्यापिका यांनी कोरोना प्रादुर्भावाच्या काळात शाळेला सुट्टी असताना काही कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन त्यांच्या खात्यात जमा केले नसल्याचे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, त्यांच्या देय वेतनापैकी काही रक्कम संबंधितांना देऊन उर्वरित रक्कमेचा अपहार केल्याची तक्रार धारणी येथील एकात्मिक आदिवासी प्रकल्प अधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय;

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन संबंधित मुख्याध्यापिका यांच्याविरुध्द कोणती कार्यवाही केली आहे व करण्यात येत आहे;

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२७-०२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) खरे आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी प्रकल्प अधिकारी कार्यालय, धारणी यांचे स्तरावरुन चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल प्राप्त झाला असून अहवालाच्या अनुषंगाने संबंधित मुख्याध्यापिका यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. संबंधित मुख्याध्यापिका यांचा खुलासा प्राप्त होताच संबंधित कर्मचारी कु. एन. एच. जाधव, माध्यमिक मुख्याध्यापिका ह्या दोषी आढळल्यास त्यांचेवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील तरतूदीनुसार प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.

---

**जव्हार ( जि. पालघर ) येथील मनमोहाडी गावातील आदिवासी ग्रामस्थांना**
**रस्ता व अत्यावश्यक आरोग्याच्या मूलभूत सुविधा पुरविण्याबाबत**

**(४६) ५२२७३ (१८-०१-२०२३). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि. पालघर) येथील मनमोहाडी गावाची लोकसंख्या जवळपास १५० पेक्षा जास्त असून या गावातील आदिवासी ग्रामस्थांना अत्यावश्यक मूलभूत सोयी-सुविधा पुरविण्यात आल्या नसल्याने तेथील ग्रामस्थ मोठ्या संकटाला सामोरे जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील आदिवासींच्या विकासासाठी वीज, रस्ते, पाणी, मुलांना शिक्षण, आरोग्याच्या सुविधा, रोजगार यासाठी केंद्र व राज्य सरकारकडून कोट्यावधी रुपयांचा निधी मिळत असतानाही सदर जिल्ह्यातील मनमोहाडी गाव-पाड्यातील गोरगरीब आदिवासी अत्यावश्यक मूलभूत सोयी-सुविधांपासून वंचित रहात असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जिल्हयातील आदिवासी ग्रामस्थाना मूलभूत सोयी-सुविधांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली आहे, वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०१-०३-२०२३) :** (१), (२) व (३) पालघर जिल्ह्यातील ऐना ग्रामपंचायत अंतर्गत मनमोहाडी हे गाव येते. सदर गावात खालीलप्रमाणे मूलभूत सुविधा पुरविण्यात येत आहेत.

• सन २०१७ मध्ये १ रोहित्र (१०० के. व्ही.ए.) १० कि.मी उच्चदाब वाहिनी व ६ कि.मी लघुदाब वाहिनी द्वारे पूर्णत: विदयुतीकरण झालेले आहे.

• सदर गाव मनमोहाडी ते डोंगरपाडा या रस्त्याने जोडलेले आहे. याशिवाय रा.मा. क्र. ७७ ते मनमोहाडी रस्ता (लांबी २.५०० कि.मी.) या रस्त्याच्या कामास मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा- २ सन २०२२-२३ अंतर्गत जिल्हा निवड समितीने मान्यता दिलेली आहे. सद्यस्थितीस सदर रस्त्याच्या कामाचे सर्व्हेक्षणाचे काम कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, पालघर यांच्या कडुन प्रगतीत आहे.

• सदर गावासाठी दोन हातपंप तसेच एक पिण्याच्या पाण्याच्या विहीर द्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. तसेच जल जीवन मिशन योजने अंतर्गत सन २०२२-२३ मध्ये रु.३७.८३ लक्ष इतक्या रककमेचे काम मंजुर असुन त्याचे कार्यादेश देण्यात आलेले आहेत

• मनमोहाडी येथील विद्यार्थी आश्रमशाळा झाप ता.जव्हार येथे शिक्षण घेत आहेत.

• आरोग्य उपकेंद्र पाथर्डी व प्राथमिक आरोग्य केंद्र साकुर मार्फत मुलभूत आरोग्य सेवा पुरविण्यात येत असून सदर गावामध्ये आशा कार्यकर्ती नियुक्त करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळवण व सुरगाणा तालुक्यातील शासकीय आश्रमशाळा व वसतीगृह इमारत बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४७) ५२२८४ (१८-०१-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवण व सुरगाणा (जि.नाशिक) तालुक्यातील शासकीय आश्रमशाळा मोडकळीस आल्या असल्याने सदर तालुक्यातील एकुण ११ आश्रमशाळांसाठी नवीन इमारत बांधकाम करण्याची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आश्रमशाळासाठी नवीन इमारत बांधण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी आदिवासी मंत्री यांना माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आयुक्त आदिवासी विकास यांच्याकडून नवीन इमारत बांधकाम करण्याबाबत माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषगाने शासनाने चौकशी करुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२७-०२-२०२३) :** (१) नाशिक जिल्यातील कळवण व सुरगाणा तालुक्यात एकूण २५ आश्रमशाळा आहेत. त्यापैकी १९ शालेय इमारतीचे पक्के बांधकाम झाले असून माणी, ता.सुरगाणा येथे शालेय इमारतीचे बांधकाम मंजूर असून, सद्य:स्थितीत, सदर काम कार्यारंभ आदेश स्तरावर प्रगतीत आहे. उर्वरित ५ शालेय इमारती सद्य:स्थितीत पत्र्याच्या शेडमध्ये आहेत.

(२) व (३) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कळवण कार्यालयाकडून प्राधान्यक्रमानुसार आश्रमशाळा इमारत, वसतीगृह इमारत इत्यादी बांधकामांची अंदाजपत्रके अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचेकडे सादर करण्यात आली आहेत.

(४) पळसण, ता.सुरगाणा येथे शालेय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी दिनांक २५ नोव्हेंबर, २०२२ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वैरागड ( ता. आरमोरी, जि. गडचिरोली) येथील पाणी पुरवठा योजनेसाठी लावण्यात आलेले सौर उर्जा संयंत्र नादुरुस्त असल्याबाबत

**(४८) ५२४१३ (१७-०१-२०२३). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैरागड (ता. आरमोरी, जि. गडचिरोली) येथील पाणी पुरवठा योजनेसाठी सौर उर्जा संयंत्र लावण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किमान ५ वर्षे सौर उर्जेवर पाणी पुरवठयाची हमी असतांना वैरागड पाणी पुरवठा योजनेचे सौर उर्जा संयंत्र ५ महीन्याच्या आधीच नादुरुस्त झाल्याचे माहे नोव्हेंबर २०२२ च्या पहील्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) महाऊर्जामार्फत सन २०१७-१८ मध्ये ग्रामपंचायतींमध्ये लघुजल पाणी पुरवठा योजनेसाठी सौर पंप आस्थापित करण्याबाबत राबविण्यात आलेल्या योजनेअंतर्गत मौजे वैरागड, ता.आरमोरी, जि.गडचिरोली येथे ५ एच.पी. क्षमतेचा सौर पंप मे.इकोझेन सोल्युशन प्रा.लि. यांच्यामार्फत आस्थापित करण्यात आला आहे. सदर सौर पंप बंद असल्याबाबत मौजे वैरागड ग्रामपंचायतीने माहे जून, २०२१ मध्ये संबंधित पुरवठादाराकडे तक्रार केल्यानुसार संबंधित पुरवठादाराने सौर पंप बदलून दिला असून दि.१९ नोव्हेंबर, २०२१ रोजी पुरवठादाराने नियमित देखभाल व दुरुस्ती करुन सौर पंप कार्यान्वित केला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्ह्यात आदिवासी विभागातील आश्रमशाळांमध्ये ई-निविदा न काढता किराणा पुरवठ्याची देयके अदा केल्याबाबत

**(४९) ५२५१५ (१८-०१-२०२३). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील आदिवासी विभागातील आश्रमशाळांमध्ये मुख्याध्यापकांना ५० हजार रुपयांपर्यंत खरेदीचे अधिकार असतानाही ई-निविदा न काढता किराणा पुरवठ्याची लाखो रुपयांची देयके अदा करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२७-०२-२०२३) :** (१) हे अंशत : खरे आहे.

शासकीय आश्रमशाळेतील मुख्याध्यापक यांना शासन निर्णय आदिवासी विकास विभाग, दिनांक १६.०९.२०१३ मधील तरतुदीनुसार रुपये ५० हजार पर्यंत खरेदीचे अधिकार आहेत.

शासकीय आश्रमशाळेतील विदयार्थ्यांना भोजनासाठी लागणारे अन्नधान्य, कडधान्य, किराणा माल व मसाले पदार्थ शाळास्तरावर पुरवठा करणेसाठी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांच्या स्तरावरुन ई-निविदा प्रक्रिया सुरु आहे.

शासकीय आश्रमशाळेतील विदयार्थ्यांची भोजनाची गैरसोय होऊ नये या दृष्टीने शासन निर्णय आदिवासी विकास विभाग, दिनांक २२.०५.२००६ मधील तरतुद विचाराच घेऊन तातडीची बाब म्हणुन सात दिवस पुरेल एवढे अन्नधान्य, कडधान्य, किराणा माल व मसाले पदार्थ खरेदी करुन शाळास्तरावर पुरविणेबाबत नियोजन करण्याबाबत आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी दिनांक ०५.०७.२०२२ पत्रान्वये सर्व प्रकल्प अधिकारी यांना कळविले आहे.

त्यानुसार प्रकल्प अधिकारी/मुख्याध्यापक यांचे स्तरावर अंमलबजावणी करण्यात येत असून देयके अदा करतांना प्रकल्प अधिकारी यांची मंजुरी घेण्यात येत आहे. सद्यस्थितीत आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक स्तरावरुन अन्नधान्य, कडधान्य, किराणा माल व मसाले पदार्थचा पुरवठा करणेबाबतची ई-निविदा राबविण्याची कार्यवाही सुरु आहे.
(२) प्रश्न उद्धवत नाही.
(३) प्रश्न उद्धवत नाही.

---

**अहमदनगर शहरातील सीना नदी चुकीच्या पद्धतीने झालेला पूर नियंत्रण रेषेचा सर्व्हे रद्द करून फेरसर्व्हे करणेबाबत**

**(५०) ५२५३५ (१८-०१-२०२३). श्री.राजकुमार पटेल (मेळघाट) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्ह्यातील सीना नदीच्या उगमापासून ते शहरापर्यंत पाऊस मोजण्यासाठी पर्जन्यमापके तसेच नदीवर पूर पातळी मोजण्याकरीता शासनाने यंत्रणा किवा कर्मचारी नियुक्त केलेल नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जलसंपदा विभाग आणि खाजगी एजन्सी यांनी सीना नदी पात्रात पडणाऱ्या पर्जन्यमापकाची आकडेवारी न घेता केवळ हवामान विभागाच्या सॅटॅलाईट फोटो आणि पावसाच्या अंदाजवरुन पूर नियंत्रण रेषेचे चुकीचे सर्वेक्षण केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तत्कालीन राज्यमंत्री जलसंपदा यांनी प्रक्र १५८/ २०२२ दिनांक २६ मे, २०२२ रोजी वा त्या सुमारास बैठक घेऊन सीना नदीच्या पूर नियंत्रण पुन्हा फेर सर्वे करण्यासंबंधी आदेश दिले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बैठकीच्या अनुषंगाने नदी पात्राच्या पुर नियंत्रण रेषेचा फेर सर्वे करण्यासंबंधी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय दि.०३.०५.२०१८ व मेरी नाशिक मार्फत निर्गमित दि.१६.११.२०१५ मधील तांत्रीक परिपत्रकातील निर्देशानुसार पूररेषा आखणीचे काम पुर्ण करण्यात आले आहे.
(३) होय खरे आहे.
(४) सदर बैठकीतील निर्देशाप्रमाणे प्रथम गाळ काढून नदीचे खोलीकरण करणे आवश्यक आहे. तद्नंतर लाल व निळी पूररेषाकरिता सर्वेक्षण करणे अभिप्रेत आहे. सद्य:स्थितीत नदीतील गाळ काढण्याच्या दृष्टीने धोरण ठरविण्याची कार्यवाही शासन स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्रभवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.